# प्रादेशिक निवड समिती, चंद्रपूर

# वनरक्षक भरती प्रक्रिया - 2016

प्रादेशिक निवड समिती चंद्रपूर, वनरक्षक भरती प्रक्रियेतील शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र तपासणीत पात्र झालेल्या उमेदवारांची यादी प्रकाशित करण्यात आलेली आहे. शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र तपासणीत पात्र झालेल्या उमेदवारांची शारीरिक क्षमता चालण्याची चाचणी (25/16 कि.मी.) दिनांक 09.01.2017 रोजी घेण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**शारिरीक क्षमता चालण्याची चाचणी**

**स्थळ**

पद्मापूर गेट
दिनांक 09.01.2017
वेळ सकाळी 6.00 वाजता

### -: उमेदवारांकरिता महत्वाच्या सुचना :-

- **शारिरीक क्षमता चालण्याची चाचणी करीता पात्र उमेदवारांची यादी व प्रतिक्षा यादी अशा दोन प्रकारच्या यादी प्रकाशीत केलेल्या असून यादीतील पात्र उमेदवारांना तसेच प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना दिनांक 09.01.2017 रोजी चालण्याची चाचणी करीता येणे अनिवार्य आहे. तथापी नियुक्ती केवळ पात्र यादीतील उमेदवारानाच देण्यात येईल. एखादया प्रकरणात जर पात्र यादीतील उमेदवार उपलब्ध झाला नाही, तर अशा प्रकरणात प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती देण्यांत येईल.**
- **जाहीरातीमध्ये विहीत केलेल्या नमुन्यातील शारिरीकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सही शिक्यासह वैद्यकीय प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. सदर प्रमाणपत्रा अभावी प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**
- **उमेदवाराने वचनपत्र व पालकांचे सहमतीपत्र स्वाक्षरीने आणणे आवश्यक आहे. सदर वचनपत्रावर पालकाची स्वाक्षरी नसल्यास अश्या उमेदवारांना 25/16 कि.मी. चालण्याच्या चाचणी प्रक्रियेत सहभागी केले जाणार नाही व त्यांचा पूढील प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदरचा नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे.**

- शैक्षणिक प्रमाणपत्र तपासणीच्या वेळेस चेस्ट आय.डी.क्रमाक 2516 विमाप्र (माजी सैनिक) या उमेदवाराने 10 वी ची मुळ गुणपत्रिका सादर केलेली नसल्यामुळे त्यांना गुणपत्रिका 25 कि.मी. चालण्याच्या चाचणीसाठी येतांना सादर करणे अनिवार्य राहील. त्यांनी 10 वी ची मुळ गुणपत्रिका सादर न केल्यास त्यांचा पूढील प्रक्रियेकरीता विचार केल्या जाणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.
- उमेदवारांनी दिलेल्या निर्धारित दिनांक/वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक आहे. वेळेवर उपस्थित न होणारे उमेदवारांस नंतर संधी दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
- उमेदवाराने चालण्याच्या चाचणीच्या वेळी आवश्यक साहीत्य सोबत आणावे, उदा.बुट, पिण्याचे पाणी, ग्लुकोज इत्यादी.
- सदर चालण्याची चाचणीमध्ये पुरुष उमेदवारास 25 कि.मी. व महिला उमेदवारास 16 कि.मी. अंतर 4 तासात चालून पुर्ण करावयाचे आहे.
- उमेदवाराने चाचणीचे दरम्यान कुठल्याही प्रकारचे गैरकृत्य केल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ संबंधित उमेदवारास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल. व गैरकृत्याबाबत फौजदारी गुन्हा दाखल करयात येईल.
- उमेदवाराने भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये.
- पुढील माहितीकरीता उमेदवारांनी https:maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

सदस्य सचिव,<br>
प्रादेशिक निवड समिती तथा<br>
उपवनसंरक्षक,<br>
मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर

## चंद्रपूर प्रादेशिक निवड समिती 2016
## वनरक्षक भरती प्रक्रिया सन 2016
**( वनरक्षक पदाकरीता )**

**शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र तपासणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची चालण्याची शारिरिक क्षमता चाचणीपुर्वी शारिरीकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र**

प्रमाणीत करण्यात येते की, श्री/कु./श्रीमती --------------------------------हे पुरुष -25 कि.मी. / महिला-16 कि.मी. अंतर 4 तासामध्ये पुर्ण करण्यास शारिरीक दृष्टया व मानसिक दृष्टया सक्षम आहेत.

ठिकाण:

दिनांक: **शासकीय वैद्यकीय अधिकारी**

**( स्वाक्षरी शिक्यासह )**

# चंद्रपूर प्रादेशिक निवड समिती 2016

## उमेदवाराने द्यावयाचे वचनपत्र

**(वनरक्षक पदाकरीता)**

वनरक्षक पदभरती 2016 मध्ये मी खालील सही करणार वचनपत्र लिहुन देतो की, वनरक्षक पदभरती सन 2016 मध्ये मी उमेदवार म्हणुन आवेदनपत्र दाखल केले आहे. उपरोक्त भरती प्रक्रियेचा भाग म्हणुन शारिरीक क्षमता चालण्याची चाचणीमध्ये 25 कि.मी. (पुरुष उमेदवारास) व 16 कि.मी. (महिला उमेदवारास) 4 तासात पुर्ण करण्याच्या चाचणीमध्ये स्वेच्छेने सहभागी होत आहे. सदरहु चाचणीकरीता मी शारिरीकदृष्टया सक्षम आहे. उपरोक्त शारिरीक क्षमता चाचणी दरम्यान माझी शारिरीक वा अन्य कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास, त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

करीता वचनपत्र लिहुन देण्यात येत आहे.

**अर्जदाराची स्वाक्षरी**

ठिकाण:

दिनांक: नांव:-

## पालकाचे सहमतीपत्र

**(वनरक्षक पदाकरीता)**

माझा पाल्य श्री/कु/श्रीमती-----------------------------------------------वनरक्षक पदभरती 2016 च्या शारिरीक क्षमता चालण्याची चाचणीकरीता (पुरुष-25 कि.मी./महिला 16 कि.मी.) 4 तासात पुर्ण करण्यास शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम आहे व त्याने वरील दिलेल्या वचनपत्रास माझी सहमती आहे.

**पालकाची स्वाक्षरी**

ठिकाण:-

दिनांक:- नांव:-

**(सदर वचनपत्रावर पालकाची स्वाक्षरी नसल्यास अश्या उमेदवारांना 25/16 कि.मी. चालण्याच्या चाचणी प्रक्रियेत सहभागी केले जाणार नाही व त्यांचा पूढील प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही)**